

| वर्ष - 9 । अंक -13 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com । शनिवार, दि. 30 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- धोनीची बॅट ते ब्रॅडमन यांची कॅप
- संधी मिळाल्यास प्रशिक्षकपदासाठी तयार!
- मोदी आणि त्यांच्या आईचा अवमान
- राजकीय स्थिरता, आर्थिक स्थिरता

## भगवं वादळ — सामान्य मुंबईकर घराबाहेर पडला नाही

# आंदोलन धडकले; मुंबईकर अडकले!

## घड्याळाच्या काट्यावर धावणाऱ्या मुंबईच्या वेगालाही 'ब्रेक'

। मुंबई । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**मराठा आरक्षणासाठी आलेल्या मराठा आंदोलकांमुळं मुंबई जाम होऊन गेलीय. मनोज जरांगे मुंबईत येण्याआगोदरपासूनच म्हणजे गुरुवारपासूनच मराठा आंदोलक मुंबईत येण्यास सुरुवात झाली होती. जरांगे सकाळी मुंबईत दाखल झाल्यानंतर आंदोलनाचा केंद्रबिंदू असलेल्या आझाद मैदानात भगवं वादळच अवतरल्याचा भास व्हावा एवढी गर्दी पाहायला मिळाली.**



मुंबईत जवळपास सहा हजार वाहनं जरांगेंसोबत आल्यानं वाहतुकीचा मोठा प्रश्न निर्माण झालाय. मराठा आंदोलकांसाठी फ्री-वे राखीव ठेवण्यात आला होता. काही वेळानंतर तो बंद करण्यात आला. मनोज जरांगे आझाद मैदानातील व्यासपीठावर बसल्यानंतर आंदोलकांनी आपला मोर्चा आंघोळीसाठी वळवला. आझाद मैदानाच्या बाहेर लावण्यात आलेल्या पाण्याच्या टँकरखाली आंदोलकांनी आंघोळी उरकून घेतल्या. मराठा आंदोलक आझाद मैदानाकडून मंत्रालयाकडे गेले होते. मंत्रालयासमोरच्या रस्त्यावर आंदोलकांनी गर्दी केली. दिवसभर मंत्रालयासमोरचा रस्ता आंदोलकांनी फुलून गेला होता. आंदोलक रस्त्यावर उतरल्यानं वाहतुकीला अडथळा निर्माण झाला होता. आंदोलक मंत्रालयासमोरही घोषणा देत होते. खबरदारी म्हणून मंत्रालयासमोर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.




### चर्चगेटसह काही रेल्वे स्टेशनवर आंदोलकांची तुफान गर्दी

मंत्रालयासमोरची गर्दी कायम असतानाच चर्चगेट रेल्वे स्टेशनवरही मराठा आंदोलकांची तुफान गर्दी पाहायला मिळाली. मुंबईत आलेले मराठा आंदोलक वेगवेगळ्या मार्गानं वेगवेगळ्या रेल्वे स्टेशनवरुन आझाद मैदानाकडं येत होते. काही आंदोलकांनी आझाद मैदानावर जाण्यासाठी पश्चिम रेल्वेचा मार्गही निवडला. त्यामुळं चर्चगेटसह काही रेल्वे स्टेशनवर तुफान गर्दी पाहायला मिळाली. मुंबईत दुपारच्या सुमारास जोरदार पावसाच्या सरी बरसल्या. या पावसात आझाद मैदानात ठिकठिकाणी डबकी साचली. आंदोलक या डबक्यांमध्येही उभे होते. काही लोकांनी तर भर पावसात पावसाच्या पाण्यात साचलेल्या डबक्यातही बसकण मांडली होती. मराठा आंदोलकांचा उत्साह कुठंही कमी दिसत नव्हता.

मुंबईत फ्री वे वाहतुकीसाठी बंद होता. ईस्टर्न एक्स्प्रेस हायवेवर ठिकठिकाणी वाहतूक कोंडी होती. रेल्वे स्टेशन्सवर गर्दी होती. त्यामुळं सणासुदीच्या दिवसातही मुंबईकर घराबाहेर पडला नव्हता. एरव्ही गणेशोत्सवात लालबागचा राजा, चिंचपोकळीचा चिंतामणी, गणेशगल्लीचा मुंबईचा राजा या प्रसिद्ध गणपतींच्या दर्शन रांगांमध्ये फारशी गर्दी नव्हती.

## जरांगेंच्या आंदोलनामुळे मुंबईचा वेग मंदावला

आधीच आंदोलनामुळं वाहतूक कोंडी त्यात पावसाच्या जोरदार सरींमुळं गणेश मंडपांमध्ये फारशी गर्दी नव्हती. मुंबईत मराठा आंदोलक आले तर मुंबई जाम होईल असं आम्ही अगोदरच सांगितलं होतं, जे बोललो होतो ते करुन दाखवल्याचं जरांगे पाटलांनी सांगितलं. मुंबईत आज मराठ्यांचं भगवं वादळ पाहायला मिळालं. वारा वादळ पाऊस काहीही आलं तरी मुंबई थांबत नाही. पण भगव्या वादळानं मुंबईचा वेग मंदावला ही प्रांजल कबुली मात्र द्यावीच लागेल.

निश्चित काहीतरी मार्ग निघेल

अजित पवार यांनी आंदोलनाबाबत प्रतिक्रिया दिली

# आरक्षणाबाबत राष्ट्रवादीची भूमिका काय?

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील आजपासून मुंबईतील आझाद मैदान येथे उपोषणाला बसले आहेत. त्यांच्याबरोबर मोठ्या संख्येने मराठा आंदोलक मुंबईमध्ये दाखल झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्य सरकार आंदोलकांच्या मागण्यांबाबत सकारात्मक असल्याचे म्हटले आहे. तसेच त्यांनी प्रत्येकाला आंदोलन करण्याता अधिकार असल्याचेही म्हटले आहे.**

## मुंबईत काही ठिकाणी रास्ता रोको



### आपलं मत मांडण्याचा अधिकार

आपल्या राज्यात जेवढे काही समाज आहेत त्यांना त्यांचा न्याय मिळाला पाहिजे, त्यांना मदत मिळाली पाहिजे. त्यांच्या रास्त मागण्या मान्य झाल्या पाहिजे हीच आमची सगळ्यांची भूमिका आहे. काही मतदारसंघात वेगवेगळ्या पक्षांचे सहकारी त्यांच्यामध्ये सहभागी झाले. त्याबाबत योग्य मागण्याच्या संदर्भात प्रत्येकाला आपलं-आपलं मत मांडण्याचा अधिकार आहे.

मुंबईत सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाबाबत बोलताना अजित पवार म्हणाले की, “सरकारने राधाकृष्ण विखे पाटलांच्या अध्यक्षतेखाली एक मोठी कमेटी स्थापन केली आहे.आणि त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी त्यांनी वेळ दिला आहे. प्रत्येकाला आंदोलन करण्याचा संविधानाने, बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेने अधिकार दिला आहे. त्याचा वापर करण्याचा अधिकार सर्वांनाच आहे. तो फक्त शांततेच्या मार्गाने व्हावा... खरंतर आंदोलनाची वेळ कोणावरही येऊ नये. आंदोलनकर्त्यांचं जे काही म्हणणं आहे, त्यामधून कसं मार्ग काढता येईल यासाठी आमचं महायुतीचं सरकार प्रयत्न करत आहे आणि त्यामधून निश्चित काहीतरी मार्ग निघेल असा आम्हाला विश्वास आहे,” असे अजित पवार म्हणाले. ज्या तयारीने जरांगे आणि मराठा आंदोलक मुंबईत आले आहेत, ते सहज परत जातील असं वाटत नाही, याबद्दल विचारले असता अजित पवार म्हणाले की, “आम्ही सकारात्मक आहोत. आम्ही मार्ग काढण्याचा मनापासून प्रयत्न करत आहोत. चर्चेतून योग्य काही तो मार्ग निघेल.”मराठा आरक्षणाबाबत अजित पवार यांची भूमिका काय? असा प्रश्न विचारण्यात आल्यानंतर, “आपल्या राज्यात जेवढे काही समाज आहेत त्यांना त्यांचा न्याय मिळाला पाहिजे, त्यांना मदत मिळाली पाहिजे. त्यांच्या रास्त मागण्या मान्य झाल्या पाहिजे हीच आमची सगळ्यांची भूमिका आहे. काही मतदारसंघात वेगवेगळ्या पक्षांचे सहकारी त्यांच्यामध्ये सहभागी झाले. त्याबाबत योग्य मागण्याच्या संदर्भात प्रत्येकाला आपलं-आपलं मत मांडण्याचा अधिकार आहे,” असे अजित पवार म्हणाले.आंदोलनावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आंदोलनाला मनाई नसल्याचे म्हटले आहे. ते म्हणाले की, मनोज जरांगे पाटील उपोषणासाठी बसले आहेत. आज सकाळी आंदोलक मुंबईत आले. मुंबईत काही ठिकाणी रास्ता रोको करण्याचे प्रकार घडले. मात्र पोलिसांनी समजूत घातल्यानंतर आंदोलक बाजूला झाले. जरांगे पाटील यांनीही शांततेत आंदोलन करण्याचे आवाहन केले आहे. शासनाचीही सहकार्याची भूमिका आहे. लोकशाही पद्धतीने आंदोलन होत असेल तर त्याला कुठलीच मनाई नाही.मुंबईत सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाबाबत बोलताना अजित पवार म्हणाले की, “सरकारने राधाकृष्ण विखे पाटलांच्या अध्यक्षतेखाली एक मोठी कमेटी स्थापन केली आहे.आणि त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी त्यांनी वेळ दिला आहे. प्रत्येकाला आंदोलन करण्याचा संविधानाने, बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेने अधिकार दिला आहे. त्याचा वापर करण्याचा अधिकार सर्वांनाच आहे. तो फक्त शांततेच्या मार्गाने व्हावा... खरंतर आंदोलनाची वेळ कोणावरही येऊ नये. आंदोलनकर्त्यांचं जे काही म्हणणं आहे, त्यामधून कसं मार्ग काढता येईल यासाठी आमचं महायुतीचं सरकार प्रयत्न करत आहे आणि त्यामधून निश्चित काहीतरी मार्ग निघेल असा आम्हाला विश्वास आहे,” असे अजित पवार म्हणाले. ज्या तयारीने जरांगे आणि मराठा आंदोलक मुंबईत आले आहेत, ते सहज परत जातील असं वाटत नाही, याबद्दल विचारले असता अजित पवार म्हणाले की, “आम्ही सकारात्मक आहोत. आम्ही मार्ग काढण्याचा मनापासून प्रयत्न करत आहोत. चर्चेतून योग्य काही तो मार्ग निघेल.

# चिंचवडमधील रेल्वे उड्डाणपूल पाडणार

## 49 वर्षांपूर्वीचा उड्डाणपूल कमकुवत झाल्याचा अहवाल

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवड रेल्वे स्थानकाजवळील ४९ वर्षांपूर्वीचा कमकुवत झालेला जुना रेल्वे उड्डाणपूल पाडण्यात येणार आहे. तज्ज्ञांचा स्थापत्य विषयक लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) अहवाल आणि रेल्वे विभागाच्या मंजुरीनंतर महापालिकेने हा निर्णय घेण्यात आला आहे. जुना पूल पाडून नवीन पूल उभारला जाणार आहे.**



### वेळेची बचत मोठ्या प्रमाणात होईल

रेल्वे विभागाच्या मंजुरीनंतर येथे नवीन पूल उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यात आल्याचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी सांगितले.नवीन उड्डाणपूल उभारल्यानंतर प्रवाशांचा प्रवास सुरक्षित होईल. वेळेची बचतही मोठ्या प्रमाणात होईल. यामुळे परिसरातील वाहतूक कोंडी कमी होईल.

मुंबई-पुणे महामार्गावर महावीर चौकातून चिंचवड गावाकडे जाणारा डाव्या बाजूचा रेल्वे उड्डाणपूल १९७६ मध्ये बांधण्यात आला होता. या पुलाच्या उजव्या बाजूला समांतर उड्डाणपूल २००४ मध्ये बांधण्यात आला आहे.

सन १९७६ मध्ये बांधण्यात आलेला जुना पूल स्थापत्य विषयक लेखापरीक्षणनुसार कमकुवत असल्याचे आढळून आले. या अहवालानंतर महापालिकेने जुन्या पुलावर हलकी वाहने आणि दुचाकी वगळता इतर वाहनांना जाण्यास प्रतिबंध केला.

त्यामुळे येथून जाणारी जड वाहने आणि बसेस यांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागत होता.या पार्श्वभूमीवर हा जुना पूल पाडून त्याजागी नवीन पूल बांधण्याबाबत महापालिकेने विविध संस्थांकडून तांत्रिक आढावा घेतला.

२०२१मध्ये केलेल्या स्थापत्य विषयक लेखापरीक्षणमध्ये आणि २०२२ मध्ये पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगने केलेल्या पुनर्वलोकनानुसार जुना पूल पाडण्याची शिफारस करण्यात आली.नवीन पुलाच्या आधुनिक पुनर्बांधणीसाठी संमती दिली. त्यामुळे आता लवकरच येथील जुना पूल पाडून नवीन पूल उभारला जाणार आहे.

राजकारण

पिंपरी चिंचवडमध्ये महापालिका निवडणुकांपूर्वीच डोकेदुखी वाढली

# भाजप शहर कार्यकारणीवरून घमासान!

## नियुक्तीमध्ये डावलले; आरोप प्रत्यारोपामुळे नाराजीचे वादळ



**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**भारतीय जनता पक्षाच्या पिंपरी चिंचवड शहर कार्यकारणीची नुकतीच घोषणा झाली असून, या नव्या यादीमुळे पक्षात अंतर्गत नाराजीचा सूर वाढताना दिसत आहे. अनेक जुन्या आणि निष्ठावान पदाधिकाऱ्यांना डावलल्याचा आरोप काही कार्यकर्त्यांनी केला असून, यामुळे शहरातील भाजपच्या गोटात खळबळ उडाली आहे.नियुक्ती जाहीर झाल्यानंतर २४ तासांच्या आत नवनियुक्त उपाध्यक्ष तुषार हिंगे यांनी तडकाफडकी राजीनामा दिला. तर, किसान मोर्चाचे माजी शहराध्यक्ष संतोष तापकीर यांनी थेट आत्मदहनाचा इशारा दिला आहे.**

शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी १२६ पदाधिकाऱ्यांची जम्बो कार्यकारिणी जाहीर केली. नव्या कार्यकारिणीत काहींना बढती मिळाली, तर काहींना पूर्वीच्या पदावरच ठेवण्यात आल्याने असंतोष आहे.

अनेक ज्येष्ठ कार्यकर्त्यांना स्थान न मिळाल्याने नाराजी वाढली. नवीन कार्यकारणीमध्ये काही नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली असली, तरी काही अनुभवी आणि जुने कार्यकर्ते यादीतून वगळल्यामुळे असंतोष निर्माण झाला आहे. विशेषतः महापालिका निवडणुका जवळ आल्या असताना ही नाराजी पक्षासाठी डोकेदुखी ठरू शकते, असा राजकीय विश्लेषकांचा अंदाज आहे.

कार्यकारिणीत काटे यांनी जुने, नवे, तरुण आणि अनुभवींचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला. आगामी महापालिका निवडणुकीचा विचार करून ती बनवली गेली आहे. मात्र, यामध्ये काटे यांच्यासह ठरावीक आमदारांचे वर्चस्व पाहायला मिळत आहे. त्यावरून आता नाराजी उफाळून आली आहे. नियुक्ती जाहीर होताच माजी उपमहापौर व युवा शहराध्यक्ष तुषार हिंगे यांनी तडकाफडकी राजीनामा दिला.

पक्षात कोणतेही पद नको असून कार्यकर्ता म्हणून काम करू असे त्यांनी शहराध्यक्ष काटे यांना कळविले आहे.

दुसरीकडे किसान मोर्चाचे माजी शहराध्यक्ष व जुने कार्यकर्ते यांनीही माझ्यावर अन्याय झाल्याची भावना मांडली. तापकीर यांनी वरिष्ठ पदांची जबाबदारी सांभाळलेली असताना मला पदोन्नतीऐवजी कार्यकारीणी सदस्य म्हणून नेमण्यात आले. हा माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांच्या खच्चीकरणाचा प्रकार असल्याचा आरोप त्यांनी केला.

पक्ष विचार करणार नसेल, तर मी कार्यकारिणीचा निषेध करत असून दोन दिवसांत पक्ष कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा देतो, असे पत्र त्यांनी शहराध्यक्षांना दिले आहे. त्यांच्यापाठोपाठ शहराचे माजी चिटणीस सचिन काळभोर यांनीही नाराजी व्यक्त केली असून चुकीच्या गोष्टी पक्षाच्या निदर्शनास आणून दिल्याने डावलल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

### गटबाजीचे संकेत?

या कार्यकारणीमुळे शहर भाजपमध्ये गटबाजी उफाळून येत असल्याचे चित्र दिसत आहे. काही कार्यकर्त्यांनी सोशल मीडियावर थेट नाराजी व्यक्त करत, पक्ष नेतृत्वावर पक्षांतर्गत गटबाजीला प्रोत्साहन दिल्याचा आरोप केला आहे. "निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून केवळ विशिष्ट गटातील लोकांना संधी दिली जात आहे," अशी भावना काही नाराज कार्यकर्त्यांनी बोलून दाखवली.

> आगामी महापालिका निवडणुकांच्या दृष्टीने संघटन बळकट करून प्रत्येक फळीतील कार्यकर्त्याला संधी मिळावी असा प्रयत्न कार्यकारणी निवडीमध्ये केला गेला आहे. यातून स्थानिक पातळीवर भाजपचे संघटन मजबूत होणार आहे. सर्वांना विश्वासात घेऊन पक्षातील वरिष्ठांच्या आदेशाने कार्यकारिणी निश्चित झालेली आहे. यामध्ये कोणावर अन्याय झाला असेल, तर तो दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल.
>
> **-शत्रुघ्न काटे,** शहराध्यक्ष, भाजपा

# शहरातील २७ विसर्जन घाटांवर जीव रक्षकांची नियुक्ती!

## गणेश विसर्जन काळात नागरिकांच्या सुरक्षेसाठी अग्निशमन विभागाकडून विशेष तयारी

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**




**पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. गणेशोत्सवाला २७ ऑगस्टपासून सुरुवात झाली असून हा उत्सव ६ सप्टेंबर २०२५ पर्यंत चालणार आहे. या काळात नागरिकांच्या सुरक्षेसाठी महापालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत विशेष उपाययोजना आखण्यात आल्या आहेत.**

गणेशोत्सव काळात विसर्जन घाटांवर होणारी गर्दीची शक्यता लक्षात घेता, दुर्घटना टाळण्यासाठी अग्निशमन दल व आपत्ती व्यवस्थापन विभागाने व्यापक नियोजन केले आहे. पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील २७ अधिकृत गणेश विसर्जन घाटांवर सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. प्रत्येक घाटावर जीव रक्षकांसाठी लागणारे साहित्य लाईफ जॅकेट, लाईफ रिंग, दोरी, मेगाफोन इत्यादी उपलब्ध करून देण्यात आले आहे. घाटावरील जीव रक्षक नागरिकांना सहज ओळखता यावेत, यासाठी त्यांना अग्निशमन विभागाकडून दिलेले ऍप्रन परिधान करणे अनिवार्य करण्यात आले आहे.


### जीव रक्षक पथकांचे समन्वय अधिकारी

- किवळेगाव (पवनानदी), रावेत घाट (जलशुद्धीकरण केंद्र), रावेत भोंडेवस्ती (मळेकर) – अनिल डिंबळे – ७२६२०२३३२०
- पुनावळे गाव (राममंदिर), ताथवडे स्मशान घाट, वाल्हेकरवाडी जाधव घाट, प्राधिकरण तळे (गणेशतलाव) – गौतम इंगवले – ९२७०३१६३१६
- थेरगाव पूल नदीघाट, मोरया गोसावी पवना नदी, केशवनगर (चिंचवड घाट) – चंद्रशेखर घुळे – ९१२२२५७९८५
- पिंपरी स्मशानभूमी घाट, सुभाषनगर घाट, काळेवाडी स्मशान घाट – बाळासाहेब वैद्य – ९८२२७७४०४९
- काटेपिंपळे घाट, पिंपळे गुरव घाट, पिंपळे निळख घाट, वकड गावठाण घाट, कस्पटे वस्ती घाट – विजय घुगे – ८८८८३७५४३
- सांगवी स्मशान घाट, सांगवी दशक्रिया घाट, सांगवी वेताळबाबा मंदिर घाट – सुनील फरांदे – ७३८१८१२७०१
- कासारवाडी स्मशानभूमी घाट, फुगेवाडी स्मशानभूमी घाट, बोपखेल घाट – दिलीप गायकवाड – ९७६७३०५३२४
- चिखली स्मशान घाट, मोशी नदीघाट – विनायक नाळे – ९३७०९१५५७६
- मोशी खाण (इ) प्रभाग – विकास नाईक – ९८५०८९०४०३

> गणेशोत्सव काळात नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देऊन महापालिकेकडून नियोजन करण्यात आले आहे. २७ अधिकृत विसर्जन घाटांवर प्रशिक्षित जीव रक्षक, अग्निशमन वाहनांवर रेस्क्यू बोटी, आपत्कालीन संपर्क यंत्रणा आणि आवश्यक ती उपकरणे उपलब्ध ठेवण्यात आली आहेत. नागरिकांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने महापालिकेकडून उपाययोजना करण्यात येत आहेत.
>
> **–प्रदीप जांभळे पाटील,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

> अग्निशमन विभाग व आपत्ती व्यवस्थापन पथकांकडून घाटांवर सतत गस्त ठेवण्यात येणार आहे. आमच्याकडे रेस्क्यू ऑपरेशनसाठी प्रशिक्षित पथक, लाईफ जॅकेट्स, लाईफ रिंग्स, अग्निशमन वाहनांवर बोटी आणि बचावासाठी आवश्यक साहित्य तयार आहे. नागरिकांनी देखील सुरक्षेच्या दृष्टिने विसर्जन घाटावर गेल्यानंतर पाण्यात खोलवर जाणे टाळावे. मदतीची गरज असल्यास रेस्क्यू पथकाशी तात्काळ संपर्क साधावा.
>
> **–उमेश ढाकणे,** सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### संगतीचे जीवनात अतिशय महत्त्व आहे

आयुष्यात संगतीला फार महत्त्व असते. संगतीचा परिणाम विनासायास आणि बराचसा न कळत होत असतो. संतसंगती लाभणे ही अत्यंत भाग्याची गोष्ट आहे. ती पूर्वपुण्याईमुळेच लाभते. ज्याच्याशी आपण संगत करावी, त्याचे गुणधर्म आपल्याला येऊन चिकटतात हे आपण पाहतो. समजा, काही लोकांनी इथे यायचे ठरविले. एकाने विचार केला की आपण पायीच जाऊ, दुसरा बैलगाडीने निघाला, तिसऱ्याने आगगाडीने प्रवास केला, तर चौथा मोटारने आला. सर्वजण जर एकाच ठिकाणाहून निघाले तर साहजिकच मोटारीने येणारा सर्वात लवकर पोहोचेल; म्हणजे ज्याच्याशी संगत केली त्या वाहनाचे गुणधर्म त्याला विनासायास लाभले. संगतीची दुसरी गंमत अशी की, ज्याच्या संगतीत आपण जातो त्याच्यापुढे आपले कर्तृत्व लोप पावते. इथून पुष्कळ मुले शिक्षण घेऊन पुढे कुणी वकील झाले, तर कुणी डॉक्टर झाले. परत इथे आल्यावर त्यांनी इथल्या मुलींशी लग्ने केली. त्या मुली फारशा शिकलेल्या नसतील; परंतु वकिलाशी लग्न केलेली वकिलीणबाई झाली, डॉक्टरशी लग्न केलेली डॉक्टरीण झाली. असे जर देहाच्या संगतीने सामान्य माणसाचेही गुणधर्म आपल्यात येतात, तर सत्संगतीचा परिणाम किती होत असला पाहिजे ! आपण तिकीट काढून गाडीत बसतो. आपल्या शेजारी कोण येऊन बसेल ते आपल्या हाती नसते. तो विडी ओढणारा असला आणि आपल्याला धूर सहन होत नसला तरी नाइलाजाने तिथेच बसावे लागते. व्यसनी किंवा विषयी माणसाची संगत ही अशी तापदायक, घातक असते. उलट सत्पुरुषाची संगत ही उत्तम, लाभदायी ठरते. सत्संगतीपासून सद्वासना आणि सद्विचार प्राप्त होतात.

एखादा साधू बैरागी असेल, झाडाखाली बसला असेल. तो स्वत: उपाशी असेल तर त्याच्याकडे येणारी मंडळीही उपाशी राहतील. समर्थांकडे कुणी गेला तर ते म्हणतील, "मी भिक्षेची झोळी घेतो, तूही घे; दोघेही भिक्षा मागून आणू, आणि जे मिळेल ते शिजवून खाऊ." पण संत गृहस्थाश्रमी असेल तर आपल्याकडे येणाराला तो वाटेल ते करून खायला घालील. अन्नानुसार वासना बनते, म्हणून संताघरचे अन्न मागून घेऊन खावे. संताची देहाने संगती लाभणे सुलभ नाही. तो राहात असेल तिथून आपण लांब राहात असू; आणि जवळ राहात असलो तरी प्रपंच-कामधंद्यामुळे चोवीस तासांत त्याच्या सान्निध्यात कितीसे राहता येणार ? मग देहसंगतीचा लाभ कितीसा मिळेल ? तेव्हा नामाची संगत हीच सर्वांना सदासर्वकाळ लाभण्यासारखी उत्तम सत्संगत होय

**बोधवचन:- परमार्थ साधण्यास सत्संगती फारच उपयोगी पडते.**



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

# युद्धखोर भारत!



**संपूर्ण भारताचं, जगात जिथे जिथे भारतीय असतील, तिथून त्या सगळ्यांचं लक्ष उद्याच्या दिवसाकडे लागलं आहे. विघ्नहर्त्या, लाडक्या गणरायाचं आगमन हे एक कारण आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ५० टक्के वाढीव कर लादण्याच्या केलेल्या घोषणेची अंमलबजावणी हे दुसरं कारण. ट्रम्प यांनी सुरुवातीला भारतावर २५ टक्के ज्यादा आयातकर लादला. पण, त्यानंतर काही दिवसांतच त्यात आणखी २५ टक्क्यांची भर घातली. दंडात्मक कर म्हणून. दंड कशाचा? तर, भारत रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी करतो म्हणून.**

पहिला आयात कर बऱ्याच देशांसाठी लागू झाला. विशेषतः ज्यांच्या मुसक्या अमेरिकेला आवळायच्या होत्या, त्या सर्वांसाठी. यात भारताचा समावेश असण्याचं काहीच कारण नव्हतं. भारताने ना अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारलं, ना अमेरिकेच्या व्यापार किंवा परराष्ट्र धोरणाला कुठे विरोध केला. उलट, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे तर ट्रम्प यांच्या निवडणुकीपासूनच त्यांचा पुरस्कार करत आले आहेत. ट्रम्प यांचा उल्लेख ते नेहमीच 'भारताचा जिगरी दोस्त' असा करत असत. ट्रम्प यांच्या मर्जीनुसार अनेक अमेरिकन कंपन्यांना, त्यांच्या उत्पादनांना आपण भारताची बाजारपेठ खुली करून दिली. तरीही ट्रम्प खप्पा झाले. पहलगामच्या दहशतवादी हल्ल्याला उत्तर म्हणून भारताने पाकिस्तान विरोधात जे 'ऑपरेशन सिंदूर' राबवलं, ते थांबवण्यासाठी ट्रम्प हेच कारणीभूत होते, हे मान्य करायला भारताने नकार दिला म्हणून. हे श्रेय घेण्यासाठी ट्रम्प यांनी किमान दहा वेळा तरी दावा केला असेल. पण, भारताने त्याला एकदाही दुजोरा दिला नाही. उलट, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्रम्प यांचा अवमान होणार नाही, अशा पद्धतीने हा दावा फेटाळून लावला. मोदी यांच्या या सौजन्याची कोणाही शहाण्या माणसाने बूज राखली असती आणि विषय अलगद सोडून दिला असता. पण, ट्रम्प त्यातले नाहीत, दाखवून देण्याचा त्यांनी जणू चंगच बांधला. भारत आपला दावा मान्य करणार नसेल, तर त्याला अमेरिकेच्या 'काळ्या यादी'त जावं लागेल; एखाद्या शत्रू राष्ट्रावर जसे कर लादले जातात, त्याची मानहानी केली जाते, तसं वर्तन यांनी सुरू केलं. जाहीर विधानांचा, प्रसंगी धमक्यांचा मारा सुरू केला. भारताने मात्र राजनैतिक सभ्यता न सोडता, अत्यंत संयमाने ट्रम्प यांच्या दाव्याबाबतची आपली असहमती कायम राखली. आणखी चिडून ट्रम्प यांनी अधिकचा २५ टक्के दंडात्मक कर लावण्याची घोषणा केली. घोषणेनंतर त्याला लगेच तीन आठवड्यांची स्थगितीही दिली. ही स्थगितीच उद्या संपते आहे.

जगातील सर्वात बलवान महासत्तेचे सर्वेसर्वा असलेल्या ट्रम्प यांनी एकदा घोषणा केल्यानंतर पुन्हा त्याला तीन आठवड्यांची स्थगिती का दिली असेल? कारण, घोषणा करतानाच त्यांना माहीत होतं, भारताविरुद्ध अशी घोषणा करणं न्याय्य नाही. भारताने रशियाकडून कच्च्या तेलाची आयात स्वतःहून सुरू केली नव्हती. अमेरिका आणि युरोपमधील राष्ट्रांनी जेव्हा युक्रेन युद्धाच्या निषेधार्थ रशियावर बहिष्कार घातला, तेव्हा साहजिकपणे तेलाच्या मर्यादित उपलब्धतेवर खरेदीदारांची गर्दी झाली. त्यामुळे, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाच्या किमती वाढल्या. त्या अशाच वाढत राहिल्या, तर ते आपल्यालाच महागात पडेल हे ओळखून तेलाच्या किमती खालच्या पातळीवर स्थिर राखण्यासाठी भारताने रशियाकडून तेलाची खरेदी सुरू करावी, ही सूचना अमेरिकेनेच केली. भारतालाही ही सूचना पटली. कारण, त्यात भारतातल्या सरकारी आणि खासगी अशा दोन्ही तेल शुद्धीकरण कंपन्यांचा फायदाच होता. अमेरिका आणि युरोपची तेलाची गरज मोठी आहे; ती केवळ अमेरिकेतल्या किंवा आखातातल्या तेलाने भागणार नाही, त्यांना अधिक तेल लागणारच होतं. हे तेल ते थेट रशियातून खरेदी करू शकत नव्हते. शुद्ध केलेलं तेच तेल भारतातून खरेदी करायला त्यांना अडचण नव्हती. म्हणजे, भारताने रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी करायची, ते तेल भारतात शुद्ध करायचं आणि पुढे युरोप; गरजेनुसार अमेरिकेला विकायचं असा हा परस्पर सहमतीचा व्यापार होता. तो याच पद्धतीने सुरू असल्याचं जगात सगळ्यांनाच माहीत होतं. त्याबाबत कुणाचीच तक्रार नव्हती. 'ऑपरेशन सिंदूर' थांबवण्याचं श्रेय भारताने ट्रम्प यांना दिलं नाही, तेव्हांपासून हा व्यापार अचानक 'अनैतिक' झाला. रशियाकडून तेल खरेदी करून भारत रशियाला त्यांच्या युक्रेनविरुद्ध युद्धात मदत करतो आहे, असा आरोप ट्रम्प यांनी सुरू केला. भारत हा त्यांच्यादृष्टीने 'युद्धखोर' झाला!

सुदैवाने भारताविरुद्धचा ट्रम्प यांचा हा कांगावा जगात कोणालाच मान्य झाला नाही. अमेरिकन प्रशासनातल्याही अनेकांना तो मान्य नाही. अगदी पाकिस्तानेही त्याला दुजोरा दिला नाही! त्यामुळे, ट्रम्प यांची भलतीच अडचण झाली आहे. रशियाकडून तेल खरेदी करत असल्याच्या कारणावरून ट्रम्प यांनी भारताला लक्ष केलं असलं, तरी चीनवर तशी कारवाई करण्याची अमेरिकेची हिंमत नाही. डरकाळ्या फोडून सगळ्या जगाला घाबरवू पाहणारे ट्रम्प चीनकडे मात्र सोयीस्कर कानाडोळा करताहेत. चीनच्या ताकतीला अमेरिकेने दिलेली ही अप्रत्यक्ष मान्यताच म्हणावी लागेल. ट्रम्प यांनी दिलेल्या धमक्यांना भीक न घालता भारताने शांतपणे चीनबरोबरचे आपले मतभेद बाजूला ठेवून समन्वयाचे व्यापारी संबंध वाढवायला सुरुवात केली आहे. अमेरिकेने याची कल्पना केली नसेल. रशिया, चीन आणि भारत यानिमित्ताने अधिक जवळ आले, तर अमेरिकेला त्याचा दीर्घ फटका बसेल. भारताची ही नीती चांगलीच यशस्वी ठरते आहे. 'विघ्नहर्त्या'च्या आगमनादिवशी भारतावरचं कर दंडाचं विघ्न हटतं का, 'बुद्धिदेवता' ट्रम्पना सुबुद्धी देते का, याकडे म्हणूनच प्रत्येक भारतीयाचं लक्ष आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

मागण्या मान्य कराव्या

आरक्षण मिळाले तर आम्ही सरकारचे आभार मानू

# गोरगरीबांचे मन जिंकण्याची उत्तम संधी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईच्या आझाद मैदानात मनोज जरांगे पाटील आंदोलनासाठी बसले आहेत. त्यांच्यासह हजारो कार्यकर्ते मुंबईत आले आहेत. आज सकाळी हजारोंच्या संख्येने मराठा आंदोलक मुंबईत आले. मात्र आझाद मैदान आणि आसपासच्या परिसरात आंदोलकांची मोठी गैरसोय झाल्याची तक्रार आंदोलक करत आहेत. अनेक शौचालये, हॉटेल्स बंद ठेवल्याची तक्रार केल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी संताप व्यक्त केला. तसेच सरकारला इशारा दिला.**

## संबंधित विभागांना सतर्कतेचे निर्देश



पोलिसांनी मनोज जरांगे यांना मुंबईत आंदोलन करण्यासाठी केवळ एका दिवसाची परवानगी दिली होती. मात्र ही मुदत वाढविणार असल्याचे संकेत राज्य सरकारकडून देण्यात आले आहेत. याबाबत बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले, आंदोलनाला मुदत वाढ दिली की नाही, याबाबत मला कल्पना नाही. पण सरकारने असले भंगार खेळ खेळण्यापेक्षा असली डाव खेळावा आणि मराठ्यांना आरक्षण देऊन टाकावे.मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले, “गोरगरीबांचे मन जिंकण्याची उत्तम संधी सरकारकडे आहे. मराठे सरकारला कधीही विसरणार नाहीत. आम्हाला आरक्षण मिळाले तर आम्ही सरकारचे आभार मानू. एक एक दिवस उपोषणाला मुदतवाढ देण्यापेक्षा आमच्या मागण्या मान्य कराव्यात.”आंदोलकांना पाणी आणि जेवण मिळाले नाही, याबाबत बोलताना जरांगे पाटील म्हणाले, पोलिसांनी आजूबाजूच्या परिसरातील शौचालये बंद केले आहेत. तसेच या परिसरातील चहाच्या टपऱ्या, खाण्यापिण्याची हॉटेल बंद केले आहेत. आंदोलकांना पाणीही मिळू नये, अशी व्यवस्था केली आहे. त्यामुळे काही आंदोलक सीएसटी रेल्वे स्थानकात आसरा घेण्यासाठी गेले. सरकार इंग्रजांपेक्षाही बेकार झाले, अशी टीका जरांगे पाटील यांनी केली.मुंबईत जर आम्हाला अन्नपाणी बंद करणार असाल तर तुमच्याही सभा महाराष्ट्रात कशा होतील, हे आम्ही पाहू, असे आव्हान मनोज जरांगे पाटील यांनी दिले. तुमच्या सभांना, रेस्ट हाऊसला जाणाऱ्या पाईपलाईन बंद करू, असेही ते म्हणाले.मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला एक दिवसाची परवानगी देण्यात आली होती. त्यामुळे किती दिवस आंदोलन चालणार? असा प्रश्न विचारला असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आंदोलनाला एक दिवसाची परवानगी मिळाली होती. मात्र त्यांनी पुन्हा परवानगी मागितली आहे. कायद्याच्या चौकटीत राहून उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पोलीस पालन करतील. आंदोलनकर्ते आणि प्रशासन यांच्यातील हा प्रश्न आहे.मराठा आंदोलकांनी जेवणाची स्वतःच व्यवस्था केली असून टेम्पोमधून जेवण बनविण्याचे साहित्य आणि बॅगा घेऊन मुंबई गाठली आहे. तर अनेकजण महिनाभराचा शिधा, भांडी असे सर्वच साहित्य सोबत आणले आहे. बहुसंख्य मराठा आंदोलकांनी टेम्पोमध्येच खिचडी, तसेच चहा तयार केला. अनेकजण घरून आणलेली चटणी – भाकर खात होते. तर काहीजण मोठ्या प्रमाणात बिस्कीटचे पुडे व फरसाणची पाकिटे घेऊन आले आहेत. हा सुका खाऊ घेण्यासाठी मराठा आंदोलकांची झुंबड उडाली होती. पोलिसांनी मनोज जरांगे यांना मुंबईत आंदोलन करण्यासाठी केवळ एका दिवसाची परवानगी दिली होती. मात्र ही मुदत वाढविणार असल्याचे संकेत राज्य सरकारकडून देण्यात आले आहेत. याबाबत बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले, आंदोलनाला मुदत वाढ दिली की नाही, याबाबत मला कल्पना नाही. पण सरकारने असले भंगार खेळ खेळण्यापेक्षा असली डाव खेळावा आणि मराठ्यांना आरक्षण देऊन

### पाणी आणि जेवण मिळाले नाही

मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले, “गोरगरीबांचे मन जिंकण्याची उत्तम संधी सरकारकडे आहे. मराठे सरकारला कधीही विसरणार नाहीत. आम्हाला आरक्षण मिळाले तर आम्ही सरकारचे आभार मानू. एक एक दिवस उपोषणाला मुदतवाढ देण्यापेक्षा आमच्या मागण्या मान्य कराव्यात.”आंदोलकांना पाणी आणि जेवण मिळाले नाही.

# आंदोलनावर पोळी भाजणाऱ्यांचं तोंड भाजेल

## मुख्यमंत्री फडणवीस यांचा विरोधकांना इशारा

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश व्हावा, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हजारो आंदोलकांसह मुंबईच्या आझाद मैदान परिसरात आंदोलनासाठी बसले आहेत. मुंबईत आंदोलकांनी गर्दी केल्यामुळे गंभीर प्रश्न उपस्थित झाल्याचा आरोप विरोधक करत आहेत. तसेच आंदोलकांना सोयी-सुविधा पुरविल्या गेलेल्या नाहीत, असाही आरोप विरोधकांनी केला. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे.**



आंदोलनावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मनोज जरांगे पाटील उपोषणासाठी बसले आहेत. आज सकाळी आंदोलक मुंबईत आले. मुंबईत काही ठिकाणी रास्ता रोको करण्याचे प्रकार घडले. मात्र पोलिसांनी समजूत घातल्यानंतर आंदोलक बाजूला झाले. जरांगे पाटील यांनीही शांततेत आंदोलन करण्याचे आवाहन केले आहे. शासनाचीही सहकार्याची भूमिका आहे. लोकशाही पद्धतीने आंदोलन होत असेल तर त्याला कुठलीच मनाई नाही.उच्च न्यायालयाने जे निर्देश दिले आहेत, त्यानुसार सरकार सर्व काही मदत देईल. इतक्या मोठ्या प्रमाणात लोक आल्यानंतर काही प्रमाणात अडथळा निर्माण होतो, तसा फटका वाहतुकीला बसताना दिसत आहे. काही अतिउत्साही लोकांमुळे संपूर्ण आंदोलनाला गालबोट लागते. पण अशाप्रकारे कुणी वागू नये, याकडे लक्ष द्यावे लागेल. मनोज जरांगे पाटील यांनीही अलोकतांत्रिक आणि आडमुठे पद्धतीने वागू नये, असे आवाहन केलेले आहे”, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला एक दिवसाची परवानगी देण्यात आली होती.

### किती दिवस आंदोलन चालणार?

किती दिवस आंदोलन चालणार? असा प्रश्न विचारला असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आंदोलनाला एक दिवसाची परवानगी मिळाली होती. मात्र त्यांनी पुन्हा परवानगी मागितली आहे. कायद्याच्या चौकटीत राहून उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पोलीस पालन करतील. आंदोलनकर्ते आणि प्रशासन यांच्यातील हा प्रश्न आहे.

## व्हिडीओ व्हायरल हाणामारीचा व्हिडीओ व्हायरल; अमित शाहांकडून टीका

# मोदी आणि त्यांच्या आईचा अवमान

## काँग्रेस-भाजपा कार्यकर्ते भिडले

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसच्या दरभंगा येथील मोर्चामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या दिवंगत मातोश्रीबद्दल अपशब्द उच्चारल्याचा आरोप भाजपाकडून करण्यात आला. यानंतर आज भाजपाच्या कार्यकर्त्यांनी पाटणा येथील काँग्रेसच्या कार्यालयाबाहेर निदर्शने केली. यानंतर काँग्रेस आणि भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार झडप झाली. यानंतर झेंडे, लाठ्या-काठ्या घेऊन दोन्ही बाजूंचे कार्यकर्ते एकमेकांच्या अंगावर धावून गेले.**



भाजपाचे आमदार नितीन नबीन म्हणाले की, पंतप्रधान मोदींच्या आईचा अवमान केल्याप्रकरणी बिहारचा प्रत्येक मुलगा काँग्रेसला जशासतसे प्रत्युत्तर देईल. आम्ही याचा सूड नक्कीच घेऊ.दरम्यान काँग्रेसचे नेते पवन खेरा यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात केलेले अवमानकारक विधान भाजपाच्या एजंटनी केलेले आहे. जे दरभंगाच्या रॅलीत घुसले होते. "अवमानकारक विधान भाजपाच्याच लोकांनी आमच्या रॅलीत घुसखोरी करून केले होते. आमच्या यात्रेच्या मुद्द्यावरून लक्ष दूर करण्यासाठीच या विषयाचे राजकारण करण्यात येत आहे. त्यांच्या घुसखोरांना आम्ही पकडले असून यातून त्यांची अगतिकता लक्षात येते", असेही खेरा म्हणाले. खेरा पुढे म्हणाले की, ज्याला अटक करण्यात आली आहे, तो कुणाचा माणूस आहे, हे नीट बघा. जनतेला सर्वकाही दिसत आहे. संपूर्ण देश भाजपाच्या गुंडगिरीकडे पाहत आहे.कायदा व सुव्यवस्था विभागाचे पोलीस उपायुक्त कृष्णा मुरारी प्रसाद यांनी सांगितले की, या हाणामारी दरम्यान पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांवर दगडफेकही केली. याची आम्ही सविस्तर चौकशी करत आहोत. जर मालमत्तेचे नुकसान झाले असेल तर त्यासंदर्भातही पोलीस ठाण्यात प्रकरण दाखल केले जाईल.दरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही या प्रकरणावर भाष्य केले आहे. "काँग्रेस नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आईबद्दल अपमानास्पद शब्द वापरून निंदनीय कृत्य केले आहे. पंतप्रधान मोदींना जगात नावाजले जाते. पण राहुल गांधींनी घृणा आणि तिरस्काराच्या नकारात्मक राजकारणाची सुरुवात केली आहे. त्याचेच हे प्रदर्शन आहे", अशी टीका अमित शाह यांनी केली.अमित शाह यांनी यावेळी पंतप्रधान मोदींविरुद्ध अपशब्द वापरणाऱ्या काँग्रेस नेत्यांची यादी दिली आणि अशा भाषेचा वापर करून निवडणूक जिंकता येईल का? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. "सोनिया गांधी, मणिशंकर अय्यर, दिग्विजय सिंह, जयराम रमेश, रेणुका चौधरी आणि काँग्रेसच्या अनेक प्रवक्त्यांनी पंतप्रधान मोदींबद्दल अपमानास्पद भाषा वापरली आहे", असा आरोप अमित शाह यांनी केला. तसेच पंतप्रधान मोदींना तुम्ही जितक्या शिव्या द्याल, भाजपाचे कमळ तेवढे अधिक फुलेल, असेही ते म्हणाले.भाजपाचे आमदार नितीन नबीन म्हणाले की, पंतप्रधान मोदींच्या आईचा अवमान केल्याप्रकरणी बिहारचा प्रत्येक मुलगा काँग्रेसला जशासतसे प्रत्युत्तर देईल. आम्ही याचा सूड नक्कीच घेऊ.दरम्यान काँग्रेसचे नेते पवन खेरा यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात केलेले अवमानकारक विधान भाजपाच्या एजंटनी केलेले आहे. जे दरभंगाच्या रॅलीत घुसले होते. "अवमानकारक विधान भाजपाच्याच लोकांनी आमच्या रॅलीत घुसखोरी करून केले होते. आमच्या यात्रेच्या मुद्द्यावरून लक्ष दूर करण्यासाठीच या विषयाचे राजकारण करण्यात येत आहे. त्यांच्या घुसखोरांना आम्ही पकडले असून यातून त्यांची अगतिकता लक्षात येते", असेही खेरा म्हणाले.खेरा पुढे म्हणाले की, ज्याला अटक करण्यात आली आहे, तो कुणाचा माणूस आहे, हे नीट बघा. जनतेला सर्वकाही दिसत आहे.

### पोलीस ठाण्यात प्रकरण दाखल

संपूर्ण देश भाजपाच्या गुंडगिरीकडे पाहत आहे.कायदा व सुव्यवस्था विभागाचे पोलीस उपायुक्त कृष्णा मुरारी प्रसाद यांनी सांगितले की, या हाणामारी दरम्यान पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांवर दगडफेकही केली. याची आम्ही सविस्तर चौकशी करत आहोत. जर मालमत्तेचे नुकसान झाले असेल तर त्यासंदर्भातही पोलीस ठाण्यात प्रकरण दाखल केले जाईल.

## भारतात राजकीय स्थिरता, आर्थिक स्थिरता

# पंतप्रधान मोदींचे जपानी उद्योगांना 'मेक इन इंडिया'चे आवाहन

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज भारत-जपान आर्थिक शिखर परिषदेतील भाषणाने त्यांच्या जपान दौऱ्याची सुरुवात केली. जपान आणि भारताबाबत बोलताना ते म्हणाले की, "भारताच्या विकास प्रवासात जपान नेहमीच एक महत्त्वाचा भागीदार राहिला आहे. मेट्रो रेल्वेपासून उत्पादनापर्यंत, सेमीकंडक्टरपासून स्टार्टअपपर्यंत, जपानी कंपन्यांनी भारतात ४० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे."**



यावेळी पंतप्रधान मोदींनी जपानी उद्योगांना 'मेक इन इंडिया'चे आवाहन केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, भारतात राजकीय स्थिरता, आर्थिक स्थिरता, धोरणांमध्ये पारदर्शकता आहे. आज भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था आहे आणि लवकरच ती जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनणार आहे. भारत-जपान शिखर परिषदेत देशाच्या विकासावर बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, "काही आठवड्यांपूर्वी, आमच्या संसदेने एक नवीन आणि सरलीकृत कर व्यवस्था मंजूर केली आहे. संरक्षण आणि अवकाश क्षेत्रांनंतर, आम्ही अणुऊर्जा क्षेत्र देखील खाजगी क्षेत्रासाठी खुले करत आहोत. भारतातील या बदलामागे सुधारणा, कामगिरी आणि परिवर्तनाचा आमचा दृष्टिकोन आहे."ते पुढे म्हणाले की, "जग फक्त भारताकडे पाहत नाही, तर ते भारतावर अवलंबून आहे. गेल्या दशकात, गतिशीलता आणि लॉजिस्टिक्स पायाभूत सुविधांमध्ये मोठी प्रगती केली आहे. आमच्या बंदरांची क्षमता दुप्पट झाली आहे. जपानच्या सहकार्याने, मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल्वे प्रकल्पावर काम सुरू आहे.

### तुमच्याही सक्सेस स्टोरीज बनू

एकत्रितपणे, आपण ग्लोबल साऊथच्या, विशेषतः आफ्रिकेच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतो. मी तुम्हाला आग्रह करतो की, तुम्ही भारतात या आणि जगासाठी निर्मिती करा. (मेक इन इंडिया, मेक फॉर वर्ल्ड) सुझुकी' आणि 'डायकिन'च्या सक्सेस स्टोरीज तुमच्याही सक्सेस स्टोरीज बनू शकतात", असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

# अष्टविनायक दर्शन !

अष्टविनायक हा शब्द 'अष्ट' आणि 'विनायक' या दोन शब्दांच्या संयोगातून तयार झाला आहे. अष्ट म्हणजे आठ आणि विनायक म्हणजे आपले लाडके दैवत गणपती. कोणतेही शुभ कार्य सुरू करण्यापूर्वी प्रथम गणपतीची पूजा केली जाते. कारण गणपतीबाप्पा चौदा विद्या ,चौसष्ट कलांचा अधिपती आहे आणि सर्व विघ्ने दूर करणारा गणपतीबाप्पा आपल्या मार्गातील सर्व अडथळे दूर करतो आणि समृद्धी देतो. ही मंदिरे प्रेक्षणीय स्थळांपैकी आहेत. या आठही मंदिरांची स्थापत्य रचना अतिशय उत्कृष्ट आणि मनाला आनंद देणारी आहे. वास्तविक पुण्याच्या जवळ विविध गावांत श्रीगणेशाची आठ मंदिरे आहेत, त्यांना अष्टविनायक म्हणतात. या मंदिरांना स्वयंभू मंदिरे असेही म्हणतात. स्वयंभू म्हणजे येथे भगवान श्रीगणेश स्वतः प्रकट झाले आहेत. म्हणजेच कोणीही त्यांची मूर्ती बनवून बसवली नाही. गणेश आणि मुद्गल पुराण यांसारख्या विविध पुराणांमध्येही या मंदिरांचा उल्लेख आढळतो. ही मंदिरे अतिशय प्राचीन असून त्यांना ऐतिहासिक महत्त्वही आहे. या मंदिरांच्या यात्रेला अष्टविनायक तीर्थयात्रा असेही म्हणतात. अष्टविनायक मंदिराच्या संदर्भात असे मानले जाते की तीर्थ गणेशाची ही आठ पवित्र मंदिरे स्वतःच उगम पावली आणि जागृत झाली.



**पहिला गणपती- मोरगांवचा श्री मयुरेश्वर**



**दुसरा गणपती - सिद्धटेकचा श्री सिद्धेश्वर**



**तिसरा गणपती - पालीचा श्री बल्लाळेश्वर**




**चौथा गणपती - महाडचा श्री वरदविनायक**



**पाचवा गणपती - थेऊरचा श्री चिंतामणी**



**सहावा गणपती - लेण्याद्रीचा श्री गिरिजात्मक**



**सातवा गणपती - ओझरचा श्री विघ्नेश्वर**



**आठवा गणपती - रांजणगांवचा श्री महागणपती**



स्वस्ति श्रीगणनायकं गजमुखं मोरेश्वरं सिद्धिदम् ॥१॥
बल्लाळं मुरुडे विनायकमहं चिन्तामणिं थेवरे ॥२॥
लेण्याद्रौ गिरिजात्मजं सुवरदं विघ्नेश्वरं ओझरे ॥३॥
ग्रामे रांजणनामके गणपतिं कुर्यात् सदा मंगलम् ॥४॥

## दमदार शतक

## क्रिकेट इतिहासातील सर्वात महागड्या ५ वस्तू

# धोनीची बॅट ते ब्रॅडमन यांची कॅप

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**क्रिकेट हा खेळ सर्वात लोकप्रिय खेळांपैकी एक आहे. क्रिकेट या खेळाचा चाहतावर्ग जगभर पसरलेला आहे. क्रिकेटपटूंनी वापरलेल्या वस्तू देखील चाहत्यांना आकर्षित करतात. त्यामुळे जेव्हा एखादी वस्तू लिलावात बोली लावण्यासाठी ठेवली जाते, त्यावेळी क्रिकेट चाहते आपल्या आवडत्या खेळाडूची वस्तू खरेदी करण्यासाठी पैशांचा पाऊस पाडतात. ज्यात धोनीच्या बॅटपासून ते डॉन ब्रॅडमन यांच्या कॅपचा देखील समावेश आहे.**

## वस्तू खरेदी करण्यासाठी पैशांचा पाऊस




ऑस्ट्रेलियाचा माजी खेळाडू शेन वॉर्नने २०२० मध्ये आपली कॅप लिलावात ठेवली होती. २०२० मध्ये ऑस्ट्रेलियातील जंगलात मोठ्या प्रमाणात आग लागली होती. या आगीत झालेल्या नुकसानीची भरपाई करून काढण्यासाठी त्याने निधी गोळा करण्यासाठी ही कॅप लिलावात ठेवली होती. या कॅपवर विक्रमी १००९५०० ऑस्ट्रेलियन डॉलर्स म्हणजेच ५.७९ कोटींची बोली लागली होती. कॉमनवेल्थ बँक ऑफ ऑस्ट्रेलियाने ही विक्रमी बोली लावली होती. ही कॅप ब्रॅडमन म्युझियम, ब्रोवल येथे ठेवण्यात आली आहे.ऑस्ट्रेलियाचे दिग्गज फलंदाज डॉन ब्रॅडमन यांनी १९२८ मध्ये इंग्लंडविरूद्ध खेळताना कसोटी पदार्पण केलं होतं. त्यावेळी त्यांना मिळालेली कॅप ही २०२० मध्ये लिलावात ठेवण्यात आली होती. या कॅपवर ४५०,००० ऑस्ट्रेलियन डॉलर्स म्हणजेच २.५९ कोटी रूपये इतकी बोली लागली होती.सर डॉन ब्रॅडमन यांनी १९४६-४७ मध्ये झालेल्या मालिकेत दमदार कामगिरी केली होती. या मालिकेत त्याने ९७.१४ च्या सरासरीने फलंदाजी करताना ६८० धावा केल्या होत्या. या मालिकेत डॉन ब्रॅडमन यांनी जी बॅगी ग्रीन कॅप परिधान केली होती. त्या कॅपवर ४३८५०० ऑस्ट्रेलियन डॉलर्स म्हणजेच २.५२ कोटी रूपये बोली लागली होती. ही कॅप नॅशनल म्युझियम ऑफ ऑस्ट्रेलियामध्ये संग्रहित करण्यात आली आहे. हा तोच दौरा आहे, ज्या दौऱ्यावर डॉन ब्रॅडमन यांना १०० ची विक्रमी सरासरी गाठण्याची संधी होती. त्यांना हा विक्रम करण्यासाठी आपल्या शेवटच्या डावात अवघ्या ४ धावांची गरज होती. पण या डावात ते शून्यावर माघारी परतले होते. या कॅपवर २००३ मध्ये झालेल्या लिलावात १७०,००० युरो म्हणजेच २.२ कोटींची बोली लागली होती.

भारताचा माजी कर्णधार एमएस धोनीने मुंबईतील वानखेडे स्टेडियमव भारतीय संघाला ऐतिहासिक विजय मिळवून दिला होता. श्रीलंकेविरूद्ध झालेल्या वर्ल्डकप २०११ स्पर्धेतील अंतिम सामन्यात धोनीने षटकार मारून भारताला २८ वर्षांनंतर वर्ल्डकप जिंकून दिला होता. धोनीने ज्या बॅटने षटकार मारला होता, त्या बॅटवर विक्रमी १०००० युरो म्हणजे १.१९ कोटी रूपये इतकी बोली लागली होती. आर.के. ग्लोबल सेक्युरिटीज लिमिटेडने ही बॅट खरेदी केली होती. यासह धोनीची बॅट सर्वात महागडी बॅट ठरली होती. ऑस्ट्रेलियाचा माजी खेळाडू शेन वॉर्नने २०२० मध्ये आपली कॅप लिलावात ठेवली होती. २०२० मध्ये ऑस्ट्रेलियातील जंगलात मोठ्या प्रमाणात आग लागली होती. या आगीत झालेल्या नुकसानीची भरपाई करून काढण्यासाठी त्याने निधी गोळा करण्यासाठी ही कॅप लिलावात ठेवली होती. या कॅपवर विक्रमी १००९५०० ऑस्ट्रेलियन डॉलर्स म्हणजेच ५.७९ कोटींची बोली लागली होती. कॉमनवेल्थ बँक ऑफ ऑस्ट्रेलियाने ही विक्रमी बोली लावली होती. ही कॅप ब्रॅडमन म्युझियम, ब्रोवल येथे ठेवण्यात आली आहे.ऑस्ट्रेलियाचे दिग्गज फलंदाज डॉन ब्रॅडमन यांनी १९२८ मध्ये इंग्लंडविरूद्ध खेळताना कसोटी पदार्पण केलं होतं. त्यावेळी त्यांना मिळालेली कॅप ही २०२० मध्ये लिलावात ठेवण्यात आली होती. या कॅपवर ४५०,००० ऑस्ट्रेलियन डॉलर्स म्हणजेच २.५९ कोटी रूपये इतकी बोली लागली होती.सर डॉन ब्रॅडमन यांनी १९४६-४७ मध्ये झालेल्या मालिकेत दमदार कामगिरी केली होती. या मालिकेत त्याने ९७.१४ च्या सरासरीने फलंदाजी करताना ६८० धावा केल्या होत्या.

## सर्वात महागड्या क्रिकेट वस्तू

कॅपवर ४३८५०० ऑस्ट्रेलियन डॉलर्स म्हणजेच २.५२ कोटी रूपये बोली लागली होती. ही कॅप नॅशनल म्युझियम ऑफ ऑस्ट्रेलियामध्ये संग्रहित करण्यात आली आहे.हा तोच दौरा आहे, ज्या दौऱ्यावर डॉन ब्रॅडमन यांना १०० ची विक्रमी सरासरी गाठण्याची संधी होती. त्यांना हा विक्रम करण्यासाठी आपल्या शेवटच्या डावात अवघ्या ४ धावांची गरज होती. पण या डावात ते शून्यावर माघारी परतले होते.

## संधी मिळाल्यास प्रशिक्षकपदासाठी तयार!

# वेगळ्या भूमिकेतून क्रिकेटला योगदान देण्यास पुजारा उत्सुक

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**खेळाडू म्हणून सर्व प्रकाराच्या क्रिकेटमधून निवृत्त झालेल्या कसोटीपटू चेतेश्वर पुजाराचा वेगळ्या भूमिकेतून खेळासाठी योगदान देत राहण्याचा मानस आहे. भविष्यात प्रशिक्षकपद भूषविण्याचीही आपली तयारी असल्याचे पुजाराने नमूद केले आहे.**



भक्कम बचावासाठी ओळखल्या जाणाऱ्या पुजाराने १०३ कसोटी सामने खेळताना सात हजारहून अधिक धावा केल्या. मात्र, गेल्या काही वर्षांपासून भारतीय संघातून बाहेर राहिल्यानंतर पुजाराने खेळाडू म्हणून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला. नुकत्याच झालेल्या भारत आणि इंग्लंड यांच्यातील मालिकेदरम्यान पुजाराने समालोचन केले. भविष्यात यासह अन्यही भूमिका बजावण्यास आपल्याला आवडेल असे पुजाराने सांगितले.'मला समालोचन करताना खूप मजा आली. यापुढेही मी समालोचकाच्या भूमिकेत दिसत राहीन यात शंका नाही. तसेच प्रशिक्षकपद किंवा 'बीसीसीआय'च्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये काम करण्याबाबत विचारणा झाल्यास माझी त्यासाठी नक्कीच 'ना' नसेल," असे पुजारा म्हणाला. "मी अद्याप प्रशिक्षकपदाबाबत विचार केलेला नाही. मात्र, तशी संधी चालून आली, तर मी त्या वेळीच योग्य तो निर्णय घेईन. मला खेळाला योगदान देत राहायचे आहे, हे मी आधीच स्पष्ट केले आहे. त्यामुळे भारतीय क्रिकेटला माझ्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा होणार असेल, तर कोणतीही भूमिका बजाविण्याची माझी तयारी आहे," असे पुजाराने नमूद केले.आता ट्वेन्टी-२० क्रिकेटच्या जमान्यात पुजारासारख्या खेळपट्टीवर ठाण मांडणाऱ्या फलंदाजांची संख्या कमी होत चालली आहे.

## तिन्ही प्रारूपांबाबत विचार

'आताच्या काळातही पारंपरिक पद्धतीने खेळणारे फलंदाज संघाला हवे असतात. आता खेळात बरेच बदल झाले आहेत यात शंका नाही. तुम्ही या बदलांशी जुळवून घ्यायला हवे," असे उत्तर पुजाराने दिले. "आता केवळ कसोटीवर लक्ष केंद्रित करून चालत नाही. खेळाडू म्हणून यशस्वी कारकीर्द घडवायची असल्यास तुम्ही तिन्ही प्रारूपांबाबत विचार केला पाहिजे.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
। शनिवार ।
। दि. 30 ऑगस्ट 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्तींशी चर्चा करा

# शिक्षणामुळे आयुष्याला आकार - प्राजक्ता निरगुडकर

## शिक्षण विश्व: पिंपरी चिंचवड विद्यापीठात अभियांत्रिकी विभागाच्या 'दीक्षारंभ' कार्यक्रमात विद्यार्थ्यांचे स्वागत

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिक्षणामुळे व्यक्तीच्या आयुष्याला आकार प्राप्त होतो. अभियांत्रिकी मधील चार वर्षांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मिळालेल्या ज्ञान आणि अनुभवाचा उपयोग त्यावेळची सामाजिक गरज, सार्वजनिक प्रश्न ते सोडविण्यासाठी आवश्यक संशोधन त्याची उपयुक्तता याची सांगड घालून समाजविकासात सहभाग घेतला पाहिजे. शैक्षणिक काळात ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्तींशी चर्चा करा, संवाद साधत रहा, वेगवेगळ्या प्रकल्पांना भेटी द्या असे मार्गदर्शन मास्टर कार्ड पुणे सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग विभागाच्या संचालिका प्राजक्ता निरगुडकर यांनी केले..**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित पिंपरी चिंचवड विद्यापीठ, साते मावळ येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विद्या शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी 'दीक्षारंभ' समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुंबई येथील कस्टम विभागाचे आयुक्त गिरीधर पै, पीसीयुचे प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, स्कूल ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे विभाग प्रमुख डॉ. रामदास बिरादार, अभियांत्रिकी विभाग अधिष्ठाता डॉ. विजय पाटील आदी उपस्थित होते.

अल्पावधीतच नावलौकिक प्राप्त केलेल्या पिंपरी चिंचवड विद्यापीठात विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. स्वच्छ, सुंदर परिसर तसेच आपुलकीने शिक्षण देणारे तज्ज्ञ प्राध्यापक यामुळे पुढील चार वर्षात विद्यार्थ्यांची उत्कृष्ट शैक्षणिक प्रगती होईल, यामध्ये शंका नाही.

शैक्षणिक कालावधीत विद्यार्थ्यांनी स्वतःला सिद्ध करून नवीन कौशल्ये आत्मसात करावी. म्हणजे तुम्ही भविष्यातील आव्हानांचा समर्थपणे मुकाबला करून यशस्वी व्हाल, असे गिरीधर पै यांनी सांगितले.

डॉ. सुदीप थेपडे, डॉ. रामदास बिरादार यांनीही विद्यार्थी, पालकांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन रितू दुधमल आणि शितल विसपूते यांनी आभार मानले.

कार्यक्रमास विविध विद्या शाखेचे अधिष्ठाता, प्राध्यापक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# थेरगाव रुग्णालयात पहिली युरोलॉजी शस्त्रक्रिया यशस्वी!

## पिंपरी चिंचवड मनपा रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांची यशस्वी कामगिरी

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड :पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नवीन थेरगाव रुग्णालयात युरोलॉजी विभागातील पहिली मोठी शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे. ६४ वर्षीय रुग्णास मूत्रपिंडात अनेक गाठी असल्यामुळे दाखल करण्यात आले होते.**



या रुग्णास मधुमेहजन्य आम्लता (डायबेटिक केटोॲसिडोसिस), डाव्या हृदयपिंडाच्या स्नायूंची वाढ (लेफ्ट व्हेंट्रिक्युलर हायपरट्रॉफी) व डायस्टॉलिक डिसफंक्शन अशा गुंतागुंतीच्या तक्रारीही होत्या.

शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णाची तब्येत स्थिर ठेवण्यासाठी ॲनेस्थेशिया व मेडिसिनविभागाने समन्वय साधून आवश्यक ती पूर्वतयारी केली. या शस्त्रक्रियेसाठी जनरल ॲनेस्थेशिया देण्याची जबाबदारी डॉ. अर्चना गांधी, डॉ. पूजा कुलकर्णी, डॉ. पूनम माने व डॉ. अर्जित रेपुरिया यांनी सांभाळली. शस्त्रक्रियेच्या वेळी रुग्णाच्या रक्तातील साखरेचे प्रमाण, श्वसन-रक्ताभिसरण संतुलन तसेच शस्त्रक्रियेतील स्थिती यांचा विशेष विचार करून काटेकोर व्यवस्थापन करण्यात आले.

शस्त्रक्रिया युरोसर्जन डॉ. सुनील पालवे आणि डॉ. हनुमंत फड यांनी कौशल्यपूर्णरीत्या पूर्ण केली. मूत्रपिंडाच्या वरच्या व खालच्या भागाला लागून असलेली तब्बल १० X १० सें.मी. आकाराची गाठ यशस्वीरीत्या काढण्यात आली. संपूर्ण शस्त्रक्रिया कोणतीही गुंतागुंत न होता सुरळीतपणे पूर्ण झाली. ही शस्त्रक्रिया आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार यांच्या नेतृत्वात पार पडली. यावेळी रुग्णालयप्रमुख डॉ. राजेंद्र फिरके व डॉ. संजय सोनेकर तसेच ऑपरेशन थिएटर तंत्रज्ञ व परिचारिका टीमचे योगदान मोलाचे ठरले.

College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education

Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

Admission Schedule for
F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26 – 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad

College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education

Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

Admission Schedule for
F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26 – 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046